भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर (अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती) उद्योजकांसाठी विशेष सामुहिक प्रोत्साहन योजनेतंर्गत अनु.जाती/जमाती उद्योजकांसाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी येणारा खर्च महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे (MIDC) वर्ग करण्यास मान्यता देणेबाबत

महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,

शासन निर्णय क्र. साप्रोयो-२०१९/प्र.क.४९ /उद्योग-८,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक :- ३० मार्च, २०१९.

<u>वाचा</u> :- १) शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. साप्रोयो-२०१५/प्र.क्र. १३३/उद्योग-८,दि. ११.०२.२०१६
२) शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. साप्रोयो-२०१५/प्र.क्र. १३३/उद्योग-८,दि. ११.०५.२०१६
३) शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. मऔद्यो-२०१९/प्र.क्र. ६/उद्योग-२,दि. ०७.०३.२०१९
३) उद्योग संचालनालयाचे पत्र क्र. उसं/बाआअजाज/पासुनिप्र/मऔविम/२०१९/ अे-४९२,दि.१८.०३. २०१९
४) शासन शुध्दीपत्रक,उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. साप्रोयो-२०१९/प्र.क्र. ३८/उद्योग-८, दि. २९.०३.२०१९

<u>प्रस्तावना:-</u>

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ व्या जयंती निमित्त राज्यातील अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती उद्योजकांना उत्तेजन देऊन त्यांना स्वयंपूर्ण व आर्थिक दृष्टयां स्वावलंबी करण्याच्या उद्देशाने संदर्भाधीन क्र. १ येथील शासन निर्णय दि. ११.०२.२०१६ अन्वये नवीन योजना कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. सदर योजनेतील मुद्या क्र.११ मध्ये सुधारणांच्या अनुषंगाने शासन शुध्दीपत्रक दि.२९.०३.२०१९ अन्वये राज्यातील अनुसूचित जाती/जमाती प्रवर्गातील उद्योजकांसाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी **महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे (MIDC) रु. १४,३१,४९,८६७/- (अक्षरी रुपये चौदा कोटी एकतीस लक्ष एकोणपन्नास हजार आठशे सदुसष्ट फक्त)** इतकी रक्कम वर्ग करण्याबाबत उद्योग संचालनालयाने संदर्भ क्र. ३ येथील पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेष सामुहिक प्रोत्साहन योजनेच्या शासन निर्णय दि.११.०२.२०१६ मधील मुद्या क्र.११ च्या अनुषंगाने शासन शुध्दीपत्रक दि.२९.०३.२०१९ अन्वये करण्यात आलेल्या सुधारणांस अनुसरुन अनु.जाती/जमाती प्रवर्गातील उद्योजकांसाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत **महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे (MIDC) रु. १४,३१,४९,८६७/- (अक्षरी रुपये चौदा कोटी एकतीस लक्ष एकोणपन्नास हजार आठशे सदुसष्ट फक्त)** इतकी रक्कम वर्ग करण्याबाबतच्या प्रस्तावास शासन मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार सदर रक्कम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास (MIDC) वर्ग करण्यात यावी.

२) सदर मागणीपोटी होणारा खर्च मागणी क्र. के-७, मुख्यलेखाशिर्ष २८५२ उद्योग ८० सर्वसाधारण ७८९, अनुसूचित जाती उपयोजना, (०१) (०१) अनुसूचित जातीच्या उद्योजकांसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रोत्साहन योजना (योजनांतर्गत) (२८५२ए००४) या लेखाशीर्षाखालील सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील उपलब्ध तरतूदीतून **रु.११,१०,९३,८६७/-** तसेच "मागणी क्र. टी-५, मुख्य लेखाशीर्ष-२८५२, उद्योग ८०, सर्वसाधारण, ७९६, जनजाती

क्षेत्र उपयोजना, (०१) (०२) अनूसूचित जमाती प्रवर्गातील उद्योजकांसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेष सामुहिक प्रोत्साहन योजना (योजनांतर्गत) २८५२ ए ०१३) " या लेखाशीर्षाखाली सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील उपलब्ध तरतुदीतून **रु.३,२०,५६,०००/-** असा एकूण **रु. १४,३१,४९,८६७/- (अक्षरी रुपये चौदा कोटी एकतीस लक्ष एकोणपन्नास हजार आठशे सदुसष्ट फक्त)** इतका खर्च सन २०१८-१९ करीता मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा.

३) सदरची तरतूद आहरित करण्यासाठी लेखाधिकारी, उद्योग संचालनालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी व विकास आयुक्त (उद्योग) यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदर निधीच्या विनियोगाबाबत तसेच महालेखापाल यांच्या लोख्याशी खर्च ताळमेळ घालण्याची कार्यवाही करावी. सदर निधी प्रत्यक्ष्यात वितरित झाल्यानंतर खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापाल यांना पाठवून त्याची प्रत तसेच प्रस्तावित कामाचा वार्षिक मूल्यमापन अहवाल शासनास सादर करण्याची जबाबदारी नियंत्रक अधिकाऱ्याची राहील.

४) हा शासन निर्णय,वित्त विभाग, शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२, दि.१७ एप्रिल,२०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८ भाग पहिला, उपविभाग- पाच मधील अ.क्र.१ येथील रकना २ मध्ये नमूद महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्र. १३४ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५) प्रमाणित करण्यात येते की, हा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक , अर्थसं-२०१६/ प्र.क्र.८९/अर्थ-३ दि.०२/०४/२०१८, अर्थसं-२०१६/प्र.क्र.६९/अर्थ-३ दि.२५/०१/२०१९ व उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/२०१८-२०१९/(प्र.क्र.२३)/प्रशासन-१,दि.०६.०४.२०१८ व क्र.पुरक-२०१९ / प्र.क्र.२३ / प्रशा-१, दि.१/२/२०१९ ला अनुलक्षून सदर शासन निर्णयातील तपासणी सूचीतील लागू अटींची पूर्तता होत असल्याने निर्गमित करण्यात येत आहे.

६) सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. **२०१९०३३०१६५८५३४७१०** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशांनुसार व नावाने.

Shraddha Deven Kocharekar

Digitally signed by Shraddha Deven Kocharekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=189da489d797e1e6a67b7d97496ef70683916299eab51c867c5a13147d142a80, cn=Shraddha Deven Kocharekar
Date: 2019.04.02 12:04:19 +05'30'

(श्रध्दा कोचरेकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२.
२. सर्व संबंधित मा. मंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. सर्व संबंधित मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई.
५. सर्व विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य.
६. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळामार्फत (MSSIDC), मुंबई
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१ महाराष्ट्र, मुंबई.
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२ महाराष्ट्र, नागपूर.

११. महालेखापाल (लेखा परिक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
१२. महालेखापाल (लेखा परिक्षा)-२ महाराष्ट्र, नागपूर.
१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१४. निवासी व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१५. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी, मुंबई.
१६. विकास आयुक्त तथा उद्योग संचालक, नवीन प्रशासन इमारत, पहिला मजला, मंत्रालय, मुंबई.
१७. Dalit Indian Chamber of Commerce & Industry.
१८. सर्व कार्यासने, उद्योग विभाग, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.